महाराष्ट्र शासन

**महाराष्ट्र लोकसेवा आयोग**

त्रिशूल गोल्ड फिल्ड, प्लॉट नंबर ३४, सरोवर विहार समोर, सेक्टर ११, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई-४००६१४ ०२२-६१३१६४००

Email ID : contact-secretary@mpsc.gov.in Website : https://mpsc.gov.in , https://mpsconline.gov.in

@mpsc_office @official_mpsc

क्रमांक: एमडीआरए-१३२४/प्र.क्र.४८७/२०२४/जाहिरात दिनांक:- २४ जुलै, २०२४

# -: शुद्धिपत्रक :-

## विविध विषयांतील सहयोगी प्राध्यापक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन सेवा, गट-अ - शासकीय वैद्यकीय महाविद्यालये

## जाहिरात क्रमांक : २६३/२०२३ ते ३३१/२०२३ व ०११/२०२४ ते ०३१/२०२४

वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभागातील वैद्यकीय शिक्षण व संशोधन सेवेअंतर्गत शासकीय वैद्यकीय महाविद्यालयातील **तसेच** नव्याने स्थापन झालेल्या शासकीय वैद्यकीय महाविद्यालये, **अलिबाग, सातारा, सिंधुदुर्ग, नंदुरबार, धाराशिव व परभणी** येथील **विविध विषयांतील सहयोगी प्राध्यापक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन सेवा, गट-अ** या संवर्गातील **एकूण १८०** पदांच्या भरतीकरीता आयोगामार्फत दिनांक १५ डिसेंबर, २०२३ व दिनांक २७ फेब्रुवारी, २०२४ रोजी जाहिराती प्रसिध्द करण्यात आल्या होत्या. दरम्यानच्या काळात महाराष्ट्र राज्यातील सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासवर्गाकरीता आरक्षण अधिनियम २०२४, दिनांक २६ फेब्रुवारी, २०२४ अनुसार राज्याच्या नियंत्रणाखालील पदांवरील नियुक्तीकरीता सामाजिक आणि शैक्षणिकदृष्ट्या मागासवर्गाकरीता आरक्षणाची तरतूद विहित करण्यात आली असून सदर अधिनियमातील तरतुदी शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक बीसीसी २०२४/प्र.क्र.७५/१६-क, दिनांक २७ फेब्रुवारी, २०२४ अनुसार प्रस्तुत संवर्गाच्या विज्ञापित जाहिरातींकरीता लागू आहेत. प्रस्तुत प्रकरणी सामाजिक व शैक्षणिक शैक्षणिकदृष्ट्या मागासवर्गाकरीता आरक्षण निश्चिती करून सुधारित मागणीपत्र पाठविण्याबाबत शासनास कळविण्यात आले होते. प्रस्तुत जाहिरातीस अनुसरुन शासनाद्वारे सामाजिक व शैक्षणिक शैक्षणिक दृष्ट्या मागासवर्गाकरीता पदे आरक्षित दर्शवून सुधारित मागणीपत्रे पाठविले आहेत. त्यानुसार संबंधित जाहिरातींमधील पदांचा सामाजिक / समांतर आरक्षणाचा सुधारित तपशील खालीलप्रमाणे राहील:-

२. **विविध विषयांतील सहयोगी प्राध्यापक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन सेवा, गट-अ - शासकीय वैद्यकीय महाविद्यालये**

**२.१ भरावयाच्या पदांचा सामाजिक/समांतर आरक्षणाबाबतचा तपशील खालीलप्रमाणे आहे:-**

| जाहिरात क्रमांक व विषय | प्रवर्ग | अ.जा. | अ.ज. | वि.जा. (अ) | भ.ज. (ब) | भ.ज. (क) | भ.ज. (ड) | वि.मा.प्र. | सा.आणि शै. मा. वर्ग | आ.दु.घ. | इ.मा.व. | एकूण आरक्षित | अराखीव (खुला) | एकूण पदे |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| २६३/२०२३ | एकुण पदे | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | ०१ | -- | ०१ | -- | ०१ |
| शरीररचनाशास्त्र | सर्वसाधारण | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | ०१ | -- | ०१ | -- | ०१ |
| (Anatomy) | महिला | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- |
| | खेळाडू | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- |
| | अनाथ | -- | | | | | | | | | | | | |
| | दिव्यांग | -- | | | | | | | | | | | | |
| जाहिरात क्रमांक व विषय | प्रवर्ग | अ.जा. | अ.ज. | वि.जा. (अ) | भ.ज. (ब) | भ.ज. (क) | भ.ज. (ड) | वि.मा.प्र. | सा.आणि शै. मा. वर्ग | आ.दु.घ. | इ.मा.व. | एकूण आरक्षित | अराखीव (खुला) | एकूण पदे |
| २६८/२०२३ | एकुण पदे | -- | -- | -- | -- | -- | -- | ०१ | ०१ | ०१ | ०१ | ०४ | -- | ०४ |
| औषधवैद्यकशास्त्र | सर्वसाधारण | -- | -- | -- | -- | -- | -- | ०१ | ०१ | ०१ | ०१ | ०४ | -- | ०४ |
| (General Medicine) | महिला | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- |
| | खेळाडू | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- |
| | अनाथ | -- | | | | | | | | | | | | |
| | दिव्यांग | -- | | | | | | | | | | | | |
| जाहिरात क्रमांक व विषय | प्रवर्ग | अ.जा. | अ.ज. | वि.जा. (अ) | भ.ज. (ब) | भ.ज. (क) | भ.ज. (ड) | वि.मा.प्र. | सा.आणि शै. मा. वर्ग | आ.दु.घ. | इ.मा.व. | एकूण आरक्षित | अराखीव (खुला) | एकूण पदे |
| २७०/२०२३ | एकुण पदे | -- | ०१ | ०१ | -- | -- | -- | -- | -- | ०१* | -- | ०३ | -- | ०३ |
| मनोविकृतीशास्त्र | सर्वसाधारण | -- | ०१ | ०१ | -- | -- | -- | -- | -- | ०१ | -- | ०३ | -- | ०३ |
| (Psychiatry) | महिला | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- |
| | खेळाडू | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- |
| | अनाथ | -- | | | | | | | | | | | | |
| | दिव्यांग | -- | | | | | | | | | | | | |
| | * प्रस्तुत जाहिरातीकरीता सर्व प्रवर्गातील अर्हताप्राप्त उमेदवारांना नव्याने अर्ज करण्याची संधी देण्यात येत आहे. | | | | | | | | | | | | | |

| जाहिरात क्रमांक व विषय | प्रवर्ग | अ.जा. | अ.ज. | वि.जा. (अ) | भ.ज. (ब) | भ.ज. (क) | भ.ज. (ड) | वि.मा.प्र. | सा.आणि शै. मा. वर्ग | आ.दु.घ. | इ.मा.व. | एकुण आरक्षित | अराखीव (खुला) | एकुण पदे |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| २७३/२०२३ | एकुण पदे | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | ०१* | ०१ | -- | ०१ |
| किरणोपचारशास्त्र | सर्वसाधारण | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | ०१ | ०१ | -- | ०१ |
| (Radio- | महिला | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- |
| Therapy) | खेळाडू | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- |
| | अनाथ | -- | | | | | | | | | | | | |
| | दिव्यांग | -- | | | | | | | | | | | | |
| | * प्रस्तुत जाहिरातीकरीता इ.मा.व. प्रवर्गातील उमेदवारांना नव्याने अर्ज करण्याची संधी देण्यात येत आहे. | | | | | | | | | | | | | |

| जाहिरात क्रमांक व विषय | प्रवर्ग | अ.जा. | अ.ज. | वि.जा. (अ) | भ.ज. (ब) | भ.ज. (क) | भ.ज. (ड) | वि.मा.प्र. | सा.आणि शै. मा. वर्ग | आ.दु.घ. | इ.मा.व. | एकुण आरक्षित | अराखीव (खुला) | एकुण पदे |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| २७७/२०२३ | एकुण पदे | -- | ०१ | -- | -- | -- | -- | -- | -- | ०१ | ०१ | ०३ | -- | ०३ |
| त्वचा व | सर्वसाधारण | -- | ०१ | -- | -- | -- | -- | -- | -- | ०१ | -- | ०२ | -- | ०२ |
| गुप्तरोगशास्त्र | महिला | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | ०१ | ०१ | -- | ०१ |
| (Dermatology | खेळाडू | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- |
| , Venereology | अनाथ | -- | | | | | | | | | | | | |
| and Leprosy) | दिव्यांग | -- | | | | | | | | | | | | |

| जाहिरात क्रमांक व विषय | प्रवर्ग | अ.जा. | अ.ज. | वि.जा. (अ) | भ.ज. (ब) | भ.ज. (क) | भ.ज. (ड) | वि.मा.प्र. | सा.आणि शै. मा. वर्ग | आ.दु.घ. | इ.मा.व. | एकुण आरक्षित | अराखीव (खुला) | एकुण पदे |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| २७८/२०२३ | एकुण पदे | -- | -- | ०१ | -- | -- | -- | -- | -- | ०१ | -- | ०२ | -- | ०२ |
| नेत्रशल्यचिकि | सर्वसाधारण | -- | -- | ०१ | -- | -- | -- | -- | -- | ०१ | -- | ०२ | -- | ०२ |
| त्सा-शास्त्र | महिला | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- |
| (Opthalmology) | खेळाडू | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- |
| | अनाथ | -- | | | | | | | | | | | | |
| | दिव्यांग | -- | | | | | | | | | | | | |

**३. विविध विषयांतील सहयोगी प्राध्यापक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन सेवा, गट-अ - नव्याने स्थापन झालेले शासकीय वैद्यकीय महाविद्यालय - सिंधुदुर्ग**

**३.१ भरावयाच्या पदांचा सामाजिक/समांतर आरक्षणाबाबतचा तपशील खालीलप्रमाणे आहे:-**

| जाहिरात क्रमांक व विषय | प्रवर्ग | अ.जा. | अ.ज. | वि.जा. (अ) | भ.ज. (ब) | भ.ज. (क) | भ.ज. (ड) | वि.मा.प्र. | सा.आणि शै. मा. वर्ग | आ.दु.घ. | इ.मा.व. | एकुण आरक्षित | अराखीव (खुला) | एकुण पदे |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ३०५/२०२३ | एकुण पदे | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | ०१ | ०१ | -- | ०१ |
| नेत्रशल्यचिकि | सर्वसाधारण | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | ०१ | ०१ | -- | ०१ |
| त्सा-शास्त्र | महिला | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- |
| (Opthalmology) | खेळाडू | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- |
| | अनाथ | -- | | | | | | | | | | | | |
| | दिव्यांग | -- | | | | | | | | | | | | |

**४. विविध विषयांतील सहयोगी प्राध्यापक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन सेवा, गट-अ - नव्याने स्थापन झालेले शासकीय वैद्यकीय महाविद्यालय - धाराशिव**

**४.१ भरावयाच्या पदांचा सामाजिक/समांतर आरक्षणाबाबतचा तपशील खालीलप्रमाणे आहे:-**

| जाहिरात क्रमांक व विषय | प्रवर्ग | अ.जा. | अ.ज. | वि.जा. (अ) | भ.ज. (ब) | भ.ज. (क) | भ.ज. (ड) | वि.मा.प्र. | सा.आणि शै. मा. वर्ग | आ.दु.घ. | इ.मा.व. | एकुण आरक्षित | अराखीव (खुला) | एकुण पदे |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ३१५/२०२३ | एकुण पदे | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | ०१ | ०१ | -- | ०१ |
| औषधशास्त्र | सर्वसाधारण | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | ०१ | ०१ | -- | ०१ |
| (Phamacology) | महिला | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- |
| | खेळाडू | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- |
| | अनाथ | -- | | | | | | | | | | | | |
| | दिव्यांग | -- | | | | | | | | | | | | |

| जाहिरात क्रमांक व विषय | प्रवर्ग | अ.जा. | अ.ज. | वि.जा. (अ) | भ.ज. (ब) | भ.ज. (क) | भ.ज. (ड) | वि.मा.प्र. | सा.आणि शै. मा. वर्ग | आ.दु.घ. | इ.मा.व. | एकुण आरक्षित | अराखीव (खुला) | एकुण पदे |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| २०/२०२४ | एकुण पदे | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | ०१ | ०१ |
| बालरोगचिकित्साशास्त्र | सर्वसाधारण | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- |
| (Paediatrics) | महिला | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | ०१ | ०१ |
| | खेळाडू | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- |
| | अनाथ | -- | | | | | | | | | | | | |
| | दिव्यांग | -- | | | | | | | | | | | | |

## ५. विविध विषयांतील सहयोगी प्राध्यापक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन सेवा, गट-अ - नव्याने स्थापन झालेले शासकीय वैद्यकीय महाविद्यालय - परभणी

### ५.१ भरावयाच्या पदांचा सामाजिक/समांतर आरक्षणाबाबतचा तपशील खालीलप्रमाणे आहे:-

| जाहिरात क्रमांक व विषय | प्रवर्ग | अ.जा. | अ.ज. | वि.जा. (अ) | भ.ज. (ब) | भ.ज. (क) | भ.ज. (ड) | वि.मा.प्र. | सा.आणि शै. मा. वर्ग | आ.दु.घ. | इ.मा.व. | एकुण आरक्षित | अराखीव (खुला) | एकुण पदे |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ३२७/२०२३ | एकुण पदे | -- | -- | -- | -- | ०१ | -- | -- | -- | -- | ०१* | ०२ | -- | ०२ |
| औषधवैद्यक शास्त्र | सर्वसाधारण | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | ०१ | ०१ | -- | ०१ |
| (General Medicine) | महिला | -- | -- | -- | -- | ०१ | -- | -- | -- | -- | -- | ०१ | -- | ०१ |
| | खेळाडू | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- |
| | अनाथ | -- | | | | | | | | | | | | |
| | दिव्यांग | -- | | | | | | | | | | | | |
| | * प्रस्तुत जाहिरातीकरीता इ.मा.व. या प्रवर्गातील उमेदवारांना नव्याने अर्ज करण्याची संधी देण्यात येत आहे. | | | | | | | | | | | | | |

## ६. विविध विषयांतील सहयोगी प्राध्यापक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन सेवा, गट-अ - नव्याने स्थापन झालेले शासकीय वैद्यकीय महाविद्यालय - नंदुरबार

### ६.१ भरावयाच्या पदांचा सामाजिक/समांतर आरक्षणाबाबतचा तपशील खालीलप्रमाणे आहे:-

| जाहिरात क्रमांक व विषय | प्रवर्ग | अ.जा. | अ.ज. | वि.जा. (अ) | भ.ज. (ब) | भ.ज. (क) | भ.ज. (ड) | वि.मा.प्र. | सा.आणि शै. मा. वर्ग | आ.दु.घ. | इ.मा.व. | एकुण आरक्षित | अराखीव (खुला) | एकुण पदे |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ०२५/२०२४ | एकुण पदे | -- | -- | -- | ०१* | -- | -- | -- | -- | -- | -- | ०१ | -- | ०१ |
| नेत्रशल्यचिकि | सर्वसाधारण | -- | -- | -- | ०१ | -- | -- | -- | -- | -- | -- | ०१ | -- | ०१ |
| त्सा-शास्त्र | महिला | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- |
| (Opthalmology)) | खेळाडू | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- |
| | अनाथ | -- | | | | | | | | | | | | |
| | दिव्यांग | -- | | | | | | | | | | | | |
| | * प्रस्तुत जाहिरातीकरीता भ.ज.(ब) या प्रवर्गातील उमेदवारांना नव्याने अर्ज करण्याची संधी देण्यात येत आहे. | | | | | | | | | | | | | |

७. प्रस्तुत संवर्गाकरीता मुलाखतीसाठी पात्र ठरलेल्या उमेदवारांचा मुलाखतीचा कार्यक्रम आयोगाच्या http://mpsc.gov.in या संकेतस्थळावरील मुलाखत या सदराखाली उपलब्ध करून देण्यात येईल.

८. जाहिरातीस अनुसरुन अर्ज सादर केलेल्या उमेदवारांना मुलाखतीसाठीचे प्रवेश प्रमाणपत्रे ऑनलाईन अर्ज प्रणालीद्वारे मुलाखतीपुर्वी उपलब्ध करुन देण्यात येतील.

९. शासन निर्णय दिनांक २७ फेब्रुवारी, २०२४ अन्वये जारी करण्यात आलेल्या आदेशाच्या अनुषंगाने, सदर मूळ जाहिरातीस अनुसरून अराखीव (खुला) अथवा आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांतून अर्ज सादर केलेल्या उमेदवारांना सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासवर्गातील आरक्षणाचा लाभ घ्यावयाच्या असल्यास त्याबाबतचा विकल्प सादर करणे आवश्यक ठरते.

१०. काही उमेदवारांनी त्यांच्याकडील कुणबी नोंदीच्या आधारे इतर मागास वर्गाचे जात प्रमाणपत्र मिळाल्याचे नमूद करुन इतर मागास वर्गाचा विकल्प सादर करण्याची विनंती केली होती. त्यास अनुसरुन शासन पत्र, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांकः संकीर्ण २०२४/प्र.क्र.१३७/आरक्षण-०५, दिनांक २८ मे, २०२४ अन्वये प्राप्त अभिप्रायानुसार, अराखीव किंवा आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटक (EWS) प्रवर्गातून अर्ज सादर करणाऱ्या उमेदवारांनी इतर मागास वर्गाचे (OBC) जात प्रमाणपत्र प्राप्त केले असल्यास, अशा उमेदवारांना इतर मागास वर्गाचा (OBC) दावा उपलब्ध करुन देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. त्यानुसार ज्या उमेदवारांनी इतर मागास वर्गाचे (OBC) जात प्रमाणपत्र प्राप्त केले आहे, अशा उमेदवारांनी इतर मागास वर्गाचा दावा करण्यासाठी विकल्प सादर करणे आवश्यक ठरते.

११. केवळ इतर मागास वर्ग व/अथवा सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासवर्गासाठी पद उपलब्ध असलेल्या जाहिरातींकरीता संबंधित प्रवर्गातील सर्व उमेदवारांना नव्याने अर्ज करण्याची संधी उपलब्ध करून देण्यात येत आहे.

१२. आयोगाकडून प्रसिद्ध करण्यात आलेल्या **उपरोक्त सर्व जाहिरातीं**करीता अर्जाद्वारे फक्त अराखीव (खुला) अथवा आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातून अर्ज केलेल्या उमेदवारांना इतर मागास वर्ग तसेच सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासवर्गाचा दावा करण्याकरीता विकल्प सादर करणे तसेच अराखीव (खुला) मधील उमेदवार जे मूळ जाहिरातीकरीता **वयाधिक ठरल्याने** अर्ज सादर करू शकले नाहीत, अशा इतर मागास वर्ग आणि सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासवर्गातील उमेदवारांकरीता तसेच संबंधित जाहिरातींच्या खाली नमूद करण्यात आलेल्या प्रवर्गातील (आरक्षण बदलामुळे) उमेदवारांना नव्याने अर्ज सादर करण्यासंदर्भात खालीलप्रमाणे कार्यवाही करणे आवश्यक आहे :-

(१) संबंधित उमेदवार आयोगाच्या ऑनलाईन अर्ज प्रणालीमधील उमेदवारांच्या प्रोफाईल मधील "My Account" सदराखाली प्रस्तुत परीक्षेच्या जाहिरातीकरीता उपलब्ध करून देण्यात आलेल्या Link समोर दर्शविण्यात आलेल्या "Question " या बटनावर क्लिक करून विचारण्यात येणारी माहिती नमूद करून विकल्प सादर करू शकतील.

(२) इतर मागास वर्ग तसेच सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासवर्ग दावा करण्याकरीता विकल्प सादर केल्यास संबंधित उमेदवाराचा मूळ अर्जातील दावा रद्द समजण्यात येईल.

(३) इतर मागास वर्ग तसेच सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासवर्गाचा विकल्प सादर केलेल्या उमेदवारांना कोणत्याही परिस्थितीत आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटक (EWS) चा लाभ अनुज्ञेय होणार नाही.

(४) सामाजिक व शैक्षणिक दृष्ट्या मागासवर्ग व इतर मागास वर्गातील नव्याने पात्र ठरलेल्या (अराखीव करीता वयाधिक) उमेदवारांना अर्ज सादर करण्याची संधी देण्यात आली आहे. सामाजिक व शैक्षणिक दृष्ट्या मागासवर्ग / इतर मागास वर्ग हे विकल्प निवडण्याची मुभा दिलेल्या कालावधीत बऱ्याच उमेदवारांकडे सामाजिक व शैक्षणिक दृष्ट्या मागासवर्ग / इतर मागास वर्ग प्रवर्गाचे जात प्रमाणपत्र मिळविण्यास काही अडचणी आल्या असल्याची निवेदने प्राप्त झाली होती. त्या अनुषंगाने ज्या उमेदवारांकडे सामाजिक व शैक्षणिक

दृष्टया मागासवर्ग / इतर मागास वर्ग प्रवर्गाचे प्रमाणपत्र नसल्यामुळे त्यांनी त्यांच्याकडील आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटक वर्गवारीचे प्रमाणपत्राआधारे त्यांचा मूळ अर्जातील दावा कायम ठेवला आहे अशा उमेदवारांबाबत करावयाच्या कार्यवाहीबाबत शासनाचे अभिप्राय मागविण्यात आले होते. त्यास अनुसरून शासन पत्र, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक संकीर्ण २०२४/प्र.क्र.१३७/आरक्षण-०५, दिनांक १२ जुलै, २०२४ अन्वये प्राप्त अभिप्रायानुसार महाराष्ट्र राज्यातील सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासवर्गाकरीता आरक्षण अधिनियम २०२४, दिनांक २६ फेब्रुवारी, २०२४ अन्वये ज्या उमेदवारांना सामाजिक व शैक्षणिक दृष्ट्या मागास वर्गाचे तसेच शासन निर्णय, दिनांक ०७ सप्टेंबर, २०२३ च्या अनुषंगाने गठित करण्यात आलेल्या समितीच्या शिफारशीनुसार इतर मागास वर्गाचे जात प्रमाणपत्र उपलब्ध झालेल्या उमेदवारांना आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटक प्रवर्गाचा लाभ अनुज्ञेय नाही. त्यामुळे सामाजिक व शैक्षणिक दृष्टया मागासवर्ग/ इतर मागास वर्ग प्रवर्गातील पात्र उमेदवारांना तसेच इतर कोणत्याही मागास प्रवर्गास आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटकाचा विकल्प अनुज्ञेय नाही.

(५) इतर मागस वर्ग आणि सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासवर्गासाच्या आरक्षणामुळे मागासवर्गीयांकरीता अनुज्ञेय असलेल्या वयोमर्यादेतील सवलतीस अनुसरून नव्याने पात्र ठरणारे उमेदवार ऑनलाईन अर्जप्रणालीमधील उमेदवारांच्या प्रोफाईल मधील My Account सदराखाली प्रस्तुत परीक्षेच्या जाहिरातीकरीता उपलब्ध करून देण्यात आलेल्या Link च्या आधारे इतर मागस वर्ग आणि सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासवर्गातून अर्ज सादर करू शकतील.

(६) शासनाद्वारे सामाजिक व शैक्षणिक शैक्षणिकदृष्ट्या मागासवर्गाकरीता आरक्षण निश्चिती करून पाठविण्यात आलेल्या सुधारित मागणीपत्रांनुसार काही प्रवर्गासाठी सामाजिक व/अथवा समांतर आरक्षणात बदल झाला असून सदर बदल संबंधित जाहिरातीमध्ये * चिन्हाने दर्शविण्यात आला आहे. प्रस्तुत आरक्षणातील बदलाच्या अनुषंगाने संबंधित जाहिरातीच्या खाली नमुद प्रवर्गातील उमेदवार उपरोक्त परीच्छेद क्रमांक १२(५) मधील कार्यपद्धतीनुसार नव्याने अर्ज करु शकतील. तसेच सुधारीत मागणीपत्रांनुसार आरक्षणात झालेल्या बदलांमुळे मूळ जाहिरातीत दर्शविलेल्या एखाद्या प्रवर्गासाठीचे आरक्षित पद रद्द झाल्यास/इतर प्रवर्गाकडे वर्ग केल्यास व संबंधित जाहिरातीमध्ये अराखीव अथवा आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटकासाठी पद उपलब्ध नसल्यास अशा प्रवर्गातील उमेदवारांचा संबंधित जाहिरातीसाठी विचार करण्यात येणार नाही.

(७) संबंधित परीक्षेकरीता अर्जाद्वारे अराखीव (खुला) अथवा आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकाचा दावा केलेल्या उमेदवाराने इतर मागास वर्ग किंवा सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासवर्ग आरक्षणातून लाभ घेण्याकरीता विकल्प सादर करणे तसेच नव्याने अर्ज सादर करण्याची कार्यवाही खालीलप्रमाणे करणे आवश्यक आहे :-

| अ.क्र. | तपशील | विहित कालावधी |
|---|---|---|
| १ | अर्ज सादर करावयाचा कालावधी | दिनांक २६ जुलै, २०२४ रोजी १४.०० ते<br>दिनांक १० ऑगस्ट, २०२४ रोजी २३.५९ |
| २ | ऑनलाईन पध्दतीने विहित परीक्षा शुल्क भरण्याकरीता अंतिम दिनांक | दिनांक १० ऑगस्ट, २०२४ रोजी २३.५९ |
| ३ | भारतीय स्टेट बँकेमध्ये चलनाद्वारे परीक्षा शुल्क भरण्यासाठी चलनाची प्रत घेण्याचा दिनांक | दिनांक १२ ऑगस्ट, २०२४ रोजी २३.५९ |
| ४ | चलनाद्वारे परीक्षाशुल्क भरण्याचा अंतिम दिनांक | दिनांक १३ ऑगस्ट, २०२४ रोजी बँकेच्या कार्यालयीन वेळेमध्ये |

**१३.** कमाल वयोमर्यादा गणण्याचा दिनांक शैक्षणिक अर्हता व अनुभव गणण्याचा कालावधी हा मूळ जाहिरातीमध्ये नमूद दिनांकानुसारच गणण्यात येईल.

**१४.** विविध विषयांतील सहयोगी प्राध्यापक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन सेवा, गट-अ या पदाच्या मूळ जाहिरातीप्रमाणे वयोमर्यादा, शैक्षणिक अर्हता, अनुभव व इतर अटी विचारात घेऊन उमेदवारांनी अर्ज सादर करणे आवश्यक राहील.

**(१)** जाहिरात क्रमाक २६३/२०२३ ते ३३१/२०२३ करीता कमाल वयोमर्यादा गणण्याचा दिनांक १ एप्रिल, २०२४ असा राहील. तसेच शैक्षणिक अर्हता व अनुभव गणण्याचा दिनांक मूळ जाहिरातीनुसार व दिनांक १९ जानेवारी, २०२४ रोजीच्या शुद्धीपत्रकानुसार अर्ज सादर करण्याचा अंतिम दिनांक म्हणजेच दिनांक ३१ जानेवारी, २०२४ असा राहील.

(२) जाहिरात क्रमाक ०११/२०२४ ते३१/२०२४ करीता कमाल वयोमर्यादा गणण्याचा दिनांक १ जून, २०२४ असा राहील. तसेच शैक्षणिक अर्हता व अनुभव गणण्याचा दिनांक मूळ जाहिरातीनुसार अर्ज सादर करण्याचा अंतिम दिनांक म्हणजेच दिनांक २१ मार्च, २०२४ असा राहील.

**१५.** **विविध विषयांतील सहयोगी प्राध्यापक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन सेवा, गट-अ** करीता इतर मागास वर्ग आणि सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासवर्गाचा दावा करण्यासाठी विकल्प सादर करणाऱ्या तसेच नव्याने अर्ज सादर करणाऱ्या उमेदवारांचे जात प्रमाणपत्र सदर शुद्धीपत्रकाच्या विहित अंतिम दिनांकापूर्वीचे म्हणजेच **दिनांक १० ऑगस्ट, २०२४** पूर्वीचे असणे आवश्यक आहे.

**१६.** प्रस्तुत संवर्गाकरीता इतर मागास वर्ग, सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासवर्गाचा दावा करणाऱ्या तसेच आरक्षण बदलामुळे नव्याने अर्ज करणाऱ्या उमेदवारांनी सन २०२३-२०२४ अथवा २०२४-२०२५ या आर्थिक वर्षात वैध असणारे उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याचे (NCL) प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील.

**१७.** शासनाच्या दिनांक १४ मे, २०२४ रोजी प्राप्त सुधारीत मागणीपत्रानुसार आयोगाद्वारे जा. क्र.२६८/२०२३ च्या अनुषंगाने दिनांक २१ जून, २०२४ रोजी ८ पदांसाठी शुद्धिपत्रक प्रसिद्ध करण्यात येऊन त्यानुसार अराखीव अथवा आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटकातील उमेदवारांना सामाजिक व शैक्षणिक दृष्ट्या मागास प्रवर्ग अथवा इतर मागास प्रवर्गाचा दावा बदलण्यासाठी, वयाधीक ठरलेल्या उमेदवारांना नव्याने अर्ज सादर करण्यासाठी तसेच अ.जा., भ.ज.(ब) व वि.मा.प्र. या प्रवर्गातील विहीत वयोमर्यादेत असलेल्या उमेदवारांना नव्याने अर्ज करण्यासाठी दि. २५ जून, २०२४ ते दि. ०९ जुलै, २०२४ या कालावधित संधी उपलब्ध करून देण्यात आली होती. तथापि, शासनाच्या दिनांक ०४ जुलै, २०२४ व दि. १६ जुलै, २०२४ रोजीच्या पत्रान्वये प्रस्तुत जाहिरातीच्या अनुषंगाने सुधारित मागणीपत्र पाठविले असून प्रस्तुत ८ पदांपैकी २ पदे

शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, धाराशीव, (जा.क्र. ३१७/२०२३) २ पदे शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, परभणी (जा.क्र. ३२७/२०२३) व सर्वसाधारण शासकीय महाविद्यालय जा.क्र. २६८/२०२३ करिता ४ पदे उपलब्ध होत असल्याचे कळविले आहे. जा.क्र. २६८/२०२३ मधील पदसंख्या व आरक्षणात झालेल्या सुधारणांची सर्व संबंधित उमेदवारांनी नोंद घ्यावी. शासनाकडून प्राप्त सुधारित मागणीपत्रानुसार निवडप्रक्रीयेची पुढील कार्यवाही करण्यात येईल.

**१८.** उपरोक्त कार्यपद्धती सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासवर्गाच्या आरक्षणाच्या अनुषंगाने **मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे दाखल रिट याचिका क्रमांक ३४६८/२०२४ तसेच त्याअनुषंगिक इतर याचिकांवरील अंतिम निर्णयाच्या अधीन राहील. विविध विषयांतील सहयोगी प्राध्यापक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन सेवा, गट-अ** च्या मूळ जाहिरातीस व सदर शुद्धिपत्रकास, आयोगाच्या दिनांक २६ एप्रिल, २०२४ रोजीच्या प्रसिद्धीपत्रकातील तरतुदी लागू राहतील.

**१९.** शासनाकडून प्राप्त सुधारीत मागणीपत्रांनुसार एकुण १९ जाहिरातींकरीता (जा.क्र. ३१२/२०२३, ३१७/२०२३, ३२१/२०२३, ३२२/२०२३ व ०१९/२०२४) आरक्षणामध्ये कोणताही बदल झाला नसून सदर मागणीपत्रांमध्ये अराखीव, इतर मागासवर्ग, आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटक व सामाजिक व शैक्षणिक दृष्ट्या मागास प्रवर्गासाठी पदे उपलब्ध नाहीत. तसेच सुधारीत मागणीपत्रामध्ये मूळ जाहिरातीनुसार आरक्षण दर्शविले आहे. यास्तव प्रस्तुत एकूण ०५ जाहिरातीच्या अनुषंगाने मूळ जाहिरातीनुसार निवडप्रक्रीयेची पुढील कार्यवाही करण्यात येत आहे.

**२०.** दिनांक १५ डिसेंबर, २०२३ व दिनांक २७ फेब्रुवारी, २०२४ रोजी प्रसिद्ध मूळ जाहिरात, दिनांक १९ जानेवारी, २०२४ व दिनांक २१ जून, २०२४ रोजीच्या शुद्धिपत्रकामधील इतर अटी व शर्तीमध्ये कोणताही बदल नाही.

उप सचिव, (जाहिरात)

ठिकाण: नवी मुंबई

महाराष्ट्र लोकसेवा आयोग